# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 15/04/2022 (शुक्रवार)

---

## जबरी चोरी

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत १४ कि. मी. अंतरावरील मौजा मेटपांजरा शिवार येथे दिनांक १४/०४/२०२२ चे ०८.०० वा. ते ०८.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे– शरद रामाजी धुर्वे वय ४५ वर्ष रा. मेटपांजरा यांच्या बक–या चोरून नेण्याचे उद्देशाने आरोपी १) अरबाज मुशरफ मोहम्मद अझर, वय १९ वर्ष, रा. मोमिनपुरा नागपूर व ३ सोबती यांनी फिर्यादीस दुखापत करण्याचे हेतुन त्यांचे गळयावर चाकु ठेवला. फिर्यादीने प्रतिकार केला असता फिर्यादीचे उजवे हाताचे पंजाला मार लागला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३९४, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. १ ला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री बोंद्रे ९८२३९०४१४१ हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा माहुली ग्रामपंचायत समोरील चौकात येथे दिनांक १३/०४/२०२२ चे २३.५६ वा. सुमारास ट्रैक्टर चालक/मालक आरोपी नामे– देवराव खंडेराव ठाकरे वय ४५ वर्ष रा. सालई माहुली याने त्याच्या ताब्यातील एम.एच– ४०/एल– ५०९४ क्रमांकाच्या ट्रैक्टर मुंडा कि. ३,००,०००/–रू. व एम.एच– ४०/एल– ५१७८ क्रमांकाच्या ट्रैक्टर ट्रोली कि. १,००,०००/–रू. मध्ये अवैधरित्या विनापरवाना रेती भरून चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आला. आरोपीच्या ताब्यातील एक ब्रास रेती किमंती ३,०००/– रू. असा एकुण कि. ४,०३,०००/– रू. चा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोशि रूपेश राठोड पोस्टे पारशिवनी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारश्विनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास मपोहवा संगिता कोवे मो.न. ९७६६०२४२५८ या करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत निहार बार जवळ चनकापूर येथे दिनांक १३/०४/२०२२ चे २३.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— रविंद्र शोभेलाल उके वय ४३ वर्ष, रा वार्ड क्र ०१ चनकापूर याने आपल्या एमएच–४०/बीजे— ६३८८ क्रमांकाच्या ट्रक भावाचे नावाने नोटरी करून व्यावसायी करीता दिला होता. फिर्यादीचा भाउ याचा ०३ महिन्याचा पैशाचा हिशोब करून देत नव्हता म्हणून या दोघांनी ट्रक दहेगाव येथून आपल्या घरी आणून उभे केले असता आरोपी क्र ०१. साजन मनोज मिश्रा याने फिर्यादीला म्हटले 'कि तु ट्रक कशाला घेवुन आला' असे म्हटले बरोबर आरोपीने रागाचे भरात फिर्यादीचे तोंडावर जोराने भुक्की मारून खाली पाडले. त्यामुळे फिर्यादीचे डोक्याचे मागे मार लागला तसेच आरोपी कं. ०१ सोबत असेल्या तिन साथीदार यांनी त्याला जमीनीवर पटकुन पटकुन हातबुक्कीने व लातानी मारून उजव्या पायाचे मांडीवर फॅक्चर करून तसेच शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ५०४, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार सुर्यथान जळते हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर